संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१.
10 AUG 2018
प्राप्त झाले सही.............................

**सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.**
**श्रीमती अनघा शि. वैद्य, उपसंचालक.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश :- संलेको-२०१८/ प्र.क्र.१३१/कोषा प्रशा -२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०८ ऑगस्ट, २०१८.

**संदर्भ** :- १) वित्त विभाग यांचे शासन आदेश क्र.संलेको-२०१७/प्र.क्र.७७/कोषा प्रशा-२, दि.३०/०५/२०१७,
२) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.संलेको/ रोख/कार्या-१/कार्यमुक्ती आदेश/अशिवै/२०१७/५०४/३४३५, दि.३१/०७/२०१७,
३) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.संलेको/ रोख/ कार्या-१/रुजू/अशिवै/२०१७/५४३/३६७, दि.१८/०८/२०१७
४) वित्त विभाग यांचे शासन शुध्दिपत्रक क्र.बदली-२०१७/प्र.क्र.७७/कोषा प्रशा-२, दि.२८/०८/२०१७,
५) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.संलेको/ रोख/ कार्या-१/कार्यमुक्ती आदेश/अशिवै/२०१७/५६३/३७५५ , दि.२८/०१/२०१७,

-: **शासन आदेश** :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, उपसंचालक संवर्गातील श्रीमती अनघा शिरीष वैद्य, ह्या उपसंचालक (प्रशिक्षण), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या पदावर कार्यरत असताना संदर्भ क्र.१ च्या शासन आदेशान्वये त्यांची बदली मुख्य लेखा परीक्षा अधिकारी, मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई शहर या पदावर करण्यात आली. त्यानुसार संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये श्रीमती वैद्य यांना बदलीच्या पदावर हजर होण्यासाठी दि.३१/०७/२०१७ (म.नं.) रोजी संचालनालयातून कार्यमुक्त केले.

२. श्रीमती वैद्य ह्या सदर पदस्थापनेच्या पदावर हजर होण्यासाठी गेल्या असता, संबंधित कार्यालयाचे मुख्य लेखा परीक्षा अधिकारी हे पद ऊर्जा विभागाच्या अधिनस्त असल्याने त्यांना हजर करुन घेतले नाही. त्यामुळे संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये श्रीमती वैद्य ह्या दि.०१/०८/२०१७ (म.पू.) रोजी संचालनालय, लेखा व कोषागारे येथे हजर झाल्या.

३. श्रीमती वैद्य यांना संदर्भ क्र.१ च्या आदेशानुसार देण्यात आलेल्या मुख्य लेखा परीक्षा अधिकारी, मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई शहर या पदस्थापनेच्या नावामध्ये संदर्भ क्र.४ च्या शासन शुध्दीपत्रकानुसार, उपसंचालक (लेखा), विद्युत निरीक्षक यांचे कार्यालय, ऊर्जा विभाग,

कृ.मा.प.

प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई अशी सुधारणा करण्यात आली. त्यानुसार, श्रीमती वैद्य यांना संदर्भ क्र.५ च्या आदेशान्वये दि.२८/०८/२०१७ (म.नं.) रोजी संचालनालयाच्या आस्थापनेवरुन कार्यमुक्त केले. श्रीमती वैद्य या दि.३१/०८/२०१७ (म.पू.) रोजी पदस्थापनेच्या पदावर हजर झाल्या. श्रीमती वैद्य यांना दि.०१/०८/२०१७ ते दि.२८/०८/२०१७ पर्यंत एकूण २८ दिवसांचा कालावधी पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. त्यामध्ये त्यांचा कोणताही सहभाग नाही.

४. यास्तव, श्रीमती वैद्य यांना म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ च्या नियम ९ (१४) (फ) च्या तरतूदीच्या अधीन राहून दि.०१/०८/२०१७ ते दि.२८/०८/२०१७ पर्यंत एकूण २८ दिवसांचा कालावधी सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी म्हणून मंजूर करण्यात येत आहे. सदर कालावधीचे वेतन व भत्ते आहरित करण्यास लेखा अधिकारी (र.व.का.), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pandu

(माधवी गांधी)
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,*
३) अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) श्रीमती अनघा शिरीष वैद्य, उपसंचालक (लेखा), विद्युत निरीक्षक यांचे कार्यालय, ऊर्जा विभाग, प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई*
५) संबंधित अधिका-याचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
६) संबंधित अधिकारी - वैयक्तिक नस्ती*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा - २
(संचालक, लेखा व कोषागारे मार्फत)*